जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक :- २३९ दिनांक :- ०२/०९/२०२१

# रोख दिड लाख रुपयांसह रिक्षामध्ये विसरलेल्या प्रवाशाला वाहतूक पोलीस व रिक्षाचालकामुळे बॅग मिळाली परत.

दिनांक ०१/०९/२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजताचे सुमारास काशिमिरा वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार श्री सुधाकर रविंद्र सपकाळे हे नवघर नाका येथे कर्तव्यावर असतांना त्यांचेकडे एका रिक्षाचालकाने (एम एच ४७ जेडी ६८४५) येवून सांगितले की, त्याचे रिक्षामध्ये एक प्रवासी स्वत:ची बॅग विसरला असून सदरची बॅग पोलीस अंमलदार श्री सपकाळे यांचे ताब्यात दिली. सदरची बॅग कुणाची आहे हे पाहण्यासाठी श्री सपकाळे यांनी उघडली असता त्यामध्ये समोरील व्यक्तीचे ओळखपत्र व दिड लाख रुपये रोख रक्कम असे मिळून आले.

बॅगमध्ये मिळालेल्या व्हिजीटिंग कार्डवरील मोबाईल क्रमांकावर पोलीस अंमलदार श्री सपकाळे यांनी संपर्क साधला असता समोरील व्यक्तीने त्याचे नांव जय पोपटलाल गाडा असे सांगून सकाळी दहिसर येथून भाईंदरला येण्यासाठी रिक्षा केली होती मात्र दहिसर चेक नाका येथे उतरतांना माझेकडील असलेली बॅग रिक्षामध्येच विसरलो असल्याबाबत फोनद्वारे सांगीतले. त्यानंतर श्री जय पोपटलाल गाडा यांना भाईंदर येथे बोलावून सदरची बॅग त्यांचीच असल्याची खात्री करुन दिड लाख रोख रक्कम व ओळखपत्रासह असलेली बॅग श्री जय पोपटलाल गाडा यांचे ताब्यात देण्यात आली. रिक्षामध्ये रोख रकमेसह हरविलेली बॅग परत मिळाल्याने प्रवाशी श्री जय गाडा यांनी वाहतूक पोलीसांचे आभार मानून समाधान व्यक्त केले.

